## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address rdc_akola@rediffmail.com web address :www.akola.nic.in

---

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि577/2020** **दिनांक: 31 /07/2020**

---

**वाचा –**

1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897

**कोविड-19 चे अनुषंगाने कार्यालयामध्ये करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना.**

*आदेश*

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2, 3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे, **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये शहरी व ग्रामीण भागामध्ये कोविड-19 या विषाणूचा संसंर्ग झालेल्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये शालेय विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाल्यामुळे साहाजिकच विविध कार्यालयामध्ये वर्दळ वाढणार आहे. तसेच या कालावधीमध्ये कार्यालयामधील कर्मचारी आणि अभ्यागतांची संख्या सुध्दा वाढेल. त्या अनुषंगाने कोविड-19 चा प्रसार होवू नये या करिता उपाययोजना करणे गरजेचे असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला , आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार , कोविड-19 साथ उद्रेक कालावधीमध्ये कार्यालयाबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

1. कार्यालयात प्रवेश करणा-या सर्व कर्मचा-यांचे व अभ्यागतांचे दैनंदिन थर्मल/ इन्फ्रारेड थर्मामिटरद्वारे तापमान तपासण्यात यावे.
2. हवा खेळती राहण्याचे दृष्टीने कार्यालयातील सर्व खिडक्या तसेच दरवाजे उघडया ठेवण्यात याव्यात.
3. कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी मास्कचा वापर संपूर्ण कार्यालयीन वेळेमध्ये नियमित करावा.
4. कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी विषाणू संसंर्ग टाळण्यासाठी आपल्या नाकाला , डोळयांना तसेच तोंडावर वारंवार हात लावणे टाळावे.
5. जर खोकला / सर्दी असेल तर टीशू पेपर रुमालचा वापर करावा. शिंकतांना व खोकतांना रुमालचा वापर अवश्य करावा. तसेच वापरलेला टिशू पेपर बंद कचरा पेटीतच टाकावा.
6. कार्यालयातील कर्मचा-यांमध्ये किमान 3 फुटाचे अंतर राहील अशी बैठकीबाबत फेररचना करावी.
7. कार्यालयामध्ये प्रवेश करणा-या अभ्यागतांना मास्क लावल्याशिवाय कक्षामध्ये प्रवेश देण्यात येवू नये.
8. एकावेळी जास्त जास्त दोन अभ्यागतांना कक्षामध्ये उपस्थित राहील याची दक्षता घेण्यात यावी.
9. केवळ 2 व्यक्तींना निवेदने, अर्ज, इत्यादी सादर करण्याकरिता प्रवेश देण्यात यावा.

NitinN 647

10. कार्यालयाचे / शाखेचे प्रवेशद्वारासमोर हात स्वच्छ करण्याकरिता साबन, हॅन्डवॉश, सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी.
11. कार्यालयाच्या परिसराची सोडीयम हायपोक्लोराईटच्या सहायाने दैनंदिन निर्जतुकीकरण करण्यात यावे.
12. कार्यालयातील स्वच्छतागृहाची निगा राखण्यात यावी.
13. कार्यालयामधील वारंवार वापरण्यात येणा-या वस्तू उदा. दरवाजाचे कडी कोंडे, नॉब, हॅन्डल , बटन, बेल, टेबल, खुर्ची व इतर उपकरणे सोडीयम हायपोक्लोराईट चा वापर करुन स्वच्छ करुन घ्यावीत.
14. कार्यालयातील संगणक, प्रिन्टर व तदनुषांगीक बाबींची दिवसातून दोन वेळा स्वच्छता करण्यात यावी.
15. कार्यालयातील सफाई कामगारांनी ग्लोव्हचा वापर करावा.
16. कार्यालयीन पत्रव्यवहाराकरिता शक्यतोवर Whatsapp, EMial इ. सोशल नेटवर्कींगच्या माध्यमांचा वापर करण्यात यावा.
17. एकाच वाहनातून अधिकारी /कर्मचारी यांची जास्त संख्येने प्रवास करु नये.
18. शक्यतोवर कार्यालयीन बैठका, सभा प्रत्यक्ष न बोलाविता व्हीडीओ कॉन्फरंसींचा वापर करावा.
19. एकत्र बसणे, एकत्र डबा खाने किंवा एका ठिकाणी एकत्र जमा होणे टाळावे.
20. कार्यालयामध्ये येणा-या अभ्यागतांचे नांव तसेच त्यांचे मोबाईल नंबर इत्यादीची नोंद ठेवण्यात यावी.
21. कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना जास्त ताप,खोकला अथवा दम लागत असल्यास तात्काळ रुग्णालयात भरती करण्यात यावे.
22. एखा-द्या कर्मचा-याचा अहवाल पॉझीटीव्ह आल्यास कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करुन हायरिस्क व लोरिस्क अशी यादी तयार करावी.

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

सदर आदेश आज **दिनांक** 31 **जूलै** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला.**

प्रतिलिपी,

विभाग / कार्यालय (सर्व)